# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** पुणे शहर  **P.S.(ठाणे):** कोरेगांव पार्क
   **FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0062  **Year (वर्ष):** 2026
   **Date and Time of FIR (प्र. ख. दिंनाक आणि वेळ):** 07/05/2026 04:18

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भारतीय न्याय संहिता (बी एन एस), 2023 | 115(2) |
| 3 | भारतीय न्याय संहिता (बी एन एस), 2023 | 132 |
| 4 | भारतीय न्याय संहिता (बी एन एस), 2023 | 121(1) |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
   1. **Day(दिवस):** दरमियानी दिन
      **Time Period (कालावधी):**
      **Date From (दिंनाक पासून):** 05/05/2026
      **Date To ( दिंनाक पर्यंत):** 06/05/2026
      **Time From (वेळेपासून):** 18:09 बजे
      **Time To (वेळेपर्यंत):** 14:08 बजे

   (b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
      **Date (दिंनाक ):** 07/05/2026  **Time (वेळ):** 03:44 बजे

   (c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
      **Entry No. (नोंद क्र.):** 004
      **Date & Time (दिंनाक आणि वेळ):** 07/05/2026 03:44 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
   1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
      पश्चिम, 02 किमी  **Beat No. (बिट क्र.):**
   (b) **Address (पत्ता):** सुलक्स, कल्पतरु सोसायटी समोर ,पानटपरी जवळ बोट क्लब रोड,पुणे

   (c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
      **Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
      **District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with CamScanner

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): प्रविण नारायण निंबाळकर

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1987

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबधक विभाग ,पुणे,बंडगार्डन,पुणे शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबधक विभाग ,पुणे,बंडगार्डन,पुणे शहर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9552574140

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | गणेश शहाजी कसपटे | | | 1. 306,शकर सुमन हाईटस् भेकराई नगर,शिवशक्ती चौक फुरसुंगी ,पुणे,फुरसुंगी पोलीस स्टेशन,पुणे शहर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | दिड लाख रुपये | 150,000.00 |



Scanned with CamScanner

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

150,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिंयाद दि. 7/05/2026

मी प्रविण नारायण निंबाळकर,वय-39 वर्षे व्यवसाय नोकरी,पद-पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिंबधक विभाग पुणे मो.नं.9552574140.

मी वरील प्रमाणे असुन लाचलुचपत प्रतिंबधक विभाग पुणे येथे पोलीस निरीक्षक म्हणुन कार्यरत आहे. दि. 05/06/2026 रोजी मी लाचलुचपत प्रतिंबधक विभाग ,पुणे येथे हजर असताना प्रशासन अधिकारी श्री.सतिश वाळके, पोलीस उपअधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांनी तक्रारदार श्री.नितेश पुरुषोत्तम जोशी यांची लाच मागणी होत असलेबाबतची तक्रार असून त्याप्रमाणे पुढील कायदेशीर कारवाई करा असे सांगुन त्यासाठी पथक तसेच गोपनिय कारवाई कामी राखीव असलेले 1) श्री.विवेक प्रकाश गजपुरे कनिष्ठ अभियंता पिंपरी चिंचवड महानगर पालिका 2) श्री.शशिंकात भानुदास कांबळे फिटर पिंपरी चिंचवड महानगर पालिका हे पंच उपलब्ध करुन दिले. सदर पंचासमक्ष तक्रारदार यां ानी तक्रार प्रथम तोंडी कथन करुन टंकलिखीत तक्रार दिली.

तक्रारदार श्री.नितेश पुरुषोत्तम जोशी वय-52 वर्षे व्यवसाय नोकरी पद-मॅनजेर ,गगन एस डेव्हलपर्स रा. 230 महात्मा गांधी रोड कॅम्प पुणे हे गगन एस डेव्हलपर्स या कंपनीत जनरल मॅनेजर म्हणुन नोकरीस आहेत.सदर कंपनीचे मालक श्री.सुशिल घनश्यामदास अगरवाल वय-42 वर्षे व्यवसाय यांचे विरुध्द हैद्राबाद कोर्टामध्ये चेक बाऊंस ची केस नं.7095/2022 ,7098/2022 व 3152/2021 चालु आहे या संदर्भात त्यांचे विरुध्द नॉन बेलेबल वॉरंट निघालेले आहे.सदर वॉरंट मध्ये यापुर्वी दि.07 मार्च 2026 रोजी कोरेगाव पार्क पोलीस स्टेशन चे पे ालीस हवालदार गणेश कसपटे यांनी श्री.सुशिल अगरवाल यांना अटक न करणेसाठी त्यांचेकडुन 05 लाख रुपये लाच रक्कम मागणी करुन तक्रारदार यांचे समक्ष पाच लाख रुपये स्विकारलेले आहेत.दि.01/05/2026 रोजी पोलीस हवालदार गणेश कसपटे यांनी सदर वॉरंट परत आले असुन दि.07/05/2026 रोजी हैद्राबाद कोर्टामध्ये तारीख असल्याचे सांगुन तक्रारदार यांचे मालक श्री.सुशिल घनश्यामदास अगरवाल यांना सदर वॉरंट मध्ये अटक न करणेसाठी व मदत करणेसाठी अडीच लाख रूपये लाच मागणी केली.श्री.सुशिल अगरवाल हे आजारी असलेने या संदर्भात तक्रारदार यांनी दि.04/05/2026 रोजी पोहवा कसपटे यांची भेट घेतली असता त्यांनी श्री.अगरवाल यांचे विरुध्द हैद्राबाद कोर्टाचे नॉन बेलेबल वॉरंट असल्याचे सांगुन त्यांना सदर वॉरंट मध्ये अटक न करणेसाठी व मदत करणेसाठी स्वत:साठी अडीच लाख रुपयाची मागणी केली. त्यावेळी तक्रारदार यांनी एवढी रक्कम मालकाकडे नसल्याचे सांगितले असता त्यांनी तडजोडी अंती दोन लाख रुपये मागणी करुन सदर रक्कम घेऊन तक्रारदार यांना दि.04/05/2026 रोजी रात्री बोलावले होते.परंतु त्यांना पैसे देण्याची इच्छा नसल्याने तक्रारदार त्यांचेकडे पैसे घेऊन गेले नाहीत.

श्री.अगरवाल हे आजारी असल्याने या संदर्भात लाचलुचपत विभागाकडे पुढील कारवाई करणेकामी तक्रारदार यांना अधिकार पत्र दिले आहे.त्यानुसार नॉन बेलेबल वॉरंट मध्ये श्री.अगरवाल यांना अटक न करणेसाठी व मदत करणेसाठी म्हणुन दोन लाख रुपये लाच मागणी करणारे पोहवा गणेश कसपटे यांचे विरुध्द तक्रार असुन कारवाई व्हावी अशा आशयाची तक्रार दिली त्या तक्रारीवर आम्ही व पंच साक्षीदार यांनी वाचून त्यावर सहया केल्या.

त्यानंतर तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने तक्रारदार श्री.जोशी यांना पोलीस हवालदार कसपटे कोरेगाव पार्क पोलीस स्टेशन यांचेकडे लाच मागणी पडताळणी करीता सोनी कंपनीच्या काळया रंगाच्या शासकिय व्हॉईस रेकॉडर मध्ये व्ही एम इलाईट कंपनीचे 32 जीबी क्षमतेचे सिंलबद पॅकिंगमधील मेमरीकार्ड त्याचे एका बाजुस VM Elite 32GB C10 1 U V10 Micro SD HC I व दुस-या बाजुस MHH07CC0AYM-BG CMA03A01TMBC14BAT EETF32GBCO925 अशा वर्णनाचे टाकुन तक्रारदार श्री.नितेश जोशी यांचे निवेदन घेऊन त्यापाठोपाठ पंच क्र. 1 व 2 यांचे निवेदन घेतली ती वेळ 17.35 वा.ची होती.सदर निवेदन घेतेवेळी नवीन सॅनडीस्क कंपनीचे Sandisk 32 GB Micro SD HC I C4 व 2033XV6628NF BM MADE



Scanned with CamScanner

IN CHINA असे वर्णनाचे मेमेरी कार्ड मोबाईल मध्ये टाकुन पंचासमक्ष व्हिडीओ चित्रीकरण करण्यात आले आहे. त्यानंतर भेटण्याचे ठिकाण निश्चीत करणेसाठी तक्रारदार यांनी 17.52 वा चे सुमारास पोलीस हवालदार कसपटे यांना त्यांचे फोन वर कॉल केला असता कालच्याच ठिकाणी भेटण्यासाठी येण्यास सांगितले.सदरचे संभाषण शासकिय रेकॉर्डरवर ध्वनीमुद्रीत करण्यात आले आहे.

त्यानंतर पडताळणी कारवाईच्या अनुषंगाने तक्रारदार दोन्ही पंच व सापळा पथकास योग्य त्या सुचना देऊन व्हाईस रेकॉर्डर चालू करून तो तक्रारदार श्री.जोशी यांना लावुन दिला व पंच क्र.01 श्री.गजपुरे यांचेसह पडताळणीकामी लाचलुचपत प्रतिबधक विभाग ,पुणे येथुन तक्रारदार यांचे दुचाकी वरुन लेन नं.06 कोरेगाव पार्क पुणे येथे रवाना केले ती वेळ 18.09 वा ची होती.

त्यानंतर थोडया वेळाने तक्रारदार व पंच हे सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी परत आले त्यावेळी आम्ही तक्रारदार यांचेकडील व्हॉईस रेकॉर्डर काढुन बंद केला ती वेळ 19.19 वा ची होती. त्यावेळी मी तक्रारदार यांना गेल्यापासुन येईपर्यंत काय झाले असे विचारले असता त्यांनी सांगितले की, मी व पंच असे लेन नं.06 कोरेगाव पार्क येथील ज्युस सेंटर मध्ये गेलो तिथे गेल्यानंतर तक्रारदार यांनी त्यांचे मोबाईल वर पोलीस हवालदार कसपटे यांचा मिस कॉल येऊन गेल्याने पोलीस हवालदार कसपटे यांच्या फोन वर फोन केला असता त्यांनी थोडया वेळात येतो असे सांगितले.तिथे काही वेळात पोलीस हवालदार गणेश कसपटे हे आले.त्यावेळी तक्रारदार व पोहवा गणेश कसपटे यांचेमध्ये कामासंबंधी चर्चा झाली त्यावेळी पोहवा कसपटे यांनी "तुमचं काय म्हणन सांगा"? असे मला विचारले असता "माझं म्हणनय की आत्ता तू किती फायनल म्हटलय...बघ...दोन पंन्नास.. नाय तसं सांगणा म्हणजे तुझ्या हिशोबाने काय रिजनबल तुला माहितीय लास्ट टाईम आपन नाय एक शब्द न बोलतो दिले ना पाच तेव्हा म्हटल ठिकय विषय संपला तेव्हा."त्यावर कसपटे यांनी यापुर्वी पैसे स्विकारल्याचे मान्य करुन "मी तेव्हा काय बोललो नाही" असे मला म्हणाले त्यावर मी "अरे..तू कसा माहित तू लका घेवून दाखवतो बाबा" असे म्हणालो त्यावर मला पोलीस हवालदार कसपटे हे काय आम्ही सगळ बरोबरय सांगितलय "काय आत्ता काल सांगिंतल की...बोललो" त्यानंतर पोहवा कसपटे यांनी गार्डन मध्ये जाऊ असे म्हणल्याने आम्ही ज्युस सेटर मधुन शेजारी असलेल्या दामोदर वागसकर गार्डन मध्ये जाऊन बसलो त्यावेळी कसपटे मला "काय विचार...विंचारायच काय" असे म्हणाले.त्यावर मी "काय परिस्थिती तुला माहितीय पगाराला पैसे नायत सगळ...लय तानय बाबा" असे म्हणालो.त्यावर पोलीस हवालदार कसपटे "तुम्ही जे म्हणताय ते पण योग्य नाही" असे मला म्हणाले. त्यावर मी "तू सांग काय....तुझ्या डोक्यात काय?असे विचारले असता "आत्ता माझ्या डोक्यात मी बरोबर सांगितल होत" असे पोलीस हवालदार कसपटे मला म्हणाले. त्यावर मी "किती ? असे विचारले असता "तेवढच आणि किती? असे मला म्हणाले.त्यावर मी दोन लाख? थोड रिजनेबल सांग ना, थोड रिजनेबल सांग नाहीय परिस्थिती तुला माहितीय आपली लास्ट टाईम आपण,ती नाय मुमेट होत ते आपण केल ना ते सांगिंतल तसे संपावल ना या वेळी माझ ऐक माझ तेवढ ऐक म्हणत या वेळी माझ ऐक अं" असे मी पोलीस हवालदार कसपटे यांना म्हणाले असता "दिड करा आत्ता...जावू दया"असे पोहवा कसपटे म्हणाले. त्यावर मी "ठिकय दिड लाख रुपये ना? ठिकय उदया बारा एक च्या पुढे मी करणार असे म्हणालो असता पोहवा कसपटे "ठिकय" असे म्हणुन पंचासमक्ष माझे मालक यांना वॉरंट मध्ये अटक न करणेसाठी माझेकडे 02 लाख रुपयाची लाच मागणी करुन तडजोडी अंती दिड लाख रुपये लाच मागणी केली त्यानंतर मी पंच क्र.01 गजपुरे यांचेसहीत आपण थांबलेल्या ठिकाणी परत आलो. सदर पैसे देण्यासाठी मी दि.06/05/2026 दुपार पर्यंतची वेळ मागुन घेतली आहे. सदर चे संभाषण पंच क्र.01 गजपुरे यांचे समक्ष झालेले आहे.त्यानंतर मी पंच क्र.01 गजपुरे यांना गेले पासुन येई पर्यत काय झाले याबाबत विचारणा करता पंच क्र.01 गजपुरे यांनीही तक्रारदार यांचे प्रमाणे हकिकत सांगितली.त्यानंतर मी पंचासमक्ष व्हॉईस रेकॉर्डरमधील मधील ध्वनिमुद्रीत संभाषण फास्ट फॉरवर्ड करून ऐकले असता ते तक्रारदार व पंच क्र.1 यांनी सांगितलेली हकिकतप्रमाणे खरे असलेबाबतची खात्री केली असता सदर पडतळणी वेळी तक्रारदार यांचे मालक श्री.सुशिल घनश्यामदास अगरवाल यांचे विरुध्द हैद्राबाद न्यायालयात चालु असलेल्या चेक बाऊन्स केस मध्ये हैद्राबाद न्यायालयाने काढलेल्या अजामीनपात्र वॉरंट मध्ये श्री.सुशिल आगरवाल यांना अटक न करणेसाठी व मदत करणेसाठी यातील तक्रारदार श्री.जोशी यांचेकडे पोलीस हवालदार गणेश कसपटे यांनी दोन लाख रुपये लाच मागणी करुन तडजोडीअंती दिड लाख रुपये लाच रुपये लाच मागणी केल्याचे निष्पन्न झाले.त्यानंतर दि.05/05/2026 रोजीची कारवाई स्थगित करण्याचे ठरवुन पुढील कारवाई दि.06/05/2026 रोजी करण्याचे ठरले सदर बाबत सविस्तर पंचनामा करणेत आला आहे.

दि.06/05/2026 रोजी तक्रारदार हे पुढील कारवाई कामी हजर झाले सदर वेळी त्यांनी पंचासमक्ष सांगितले की, पोलीस हवालदार कसपटे यांनी मागणी केलेली लाच रक्कम त्यांना देणेसाठी घेऊन जातो असे सांगितलेने सापळापुर्व व सापळा पंचनामा कारवाई सुरू करण्यात आली.



Scanned with CamScanner

त्यानंतर आम्ही दोन्ही पंचांसमक्ष तक्रारदार नितेश जोशी यांना लाच रक्कम हजर करणेस सांगितले असता तक्रारदार यांनी त्यांचेकडील 1,50,000/-/- रुपये हजर केलेने सदर नोटांचे नंबर कागदावर लिहुन काढले त्यावर आम्ही व पंचांनी सहया केल्या. त्यानंतर अँन्थ्रासीन पावडरचे गुणधर्म समजावुन सांगुन सदर नोटांना अँन्थ्रासीन पावडर लाऊन नोटा एका पांढ-या रंगाच्या कापडी पिशवीत ठेऊन सदर पिशवीस अँन्थ्रासीन पावडर लाऊन ती पिशवी तक्रारदार यांचे पँट चे पुढील बाजुच्या उजव्या खिशामध्ये ठेवली. सापळा कारवाई करीता सोनी कंपनीच्या काळ्या रंगाच्या शासकिय व्हॉईस रेकॉडर मध्ये सॅनडिस्क कंपनीचे 32 जीबी क्षमतेचे सिलबद पॅकिंगमधील मेमरीकार्ड त्याचे एका बाजुस एका बाजुस VM Elite 32GB C10 1 U Y10 Micro SD HC I व दुस-या बाजुस MHH07CC0AYM-BG CMA03A01TMBC14BAT EETF32GBCO925 अशा वर्णनाचे नवीन मेमरी कार्ड टाकले त्यामध्ये सापळा कारवाईचे अनुषंगाने प्रथम तक्रारदार जोशी त्यानंतर दोन्ही पंचांचे निवेदन घेतले ती वेळ 12.56 वा ची होती.सदर वेळी व्हिडीओ चित्रीकरण करण्यात आले आहे. त्यावेळी मी तक्रारदार पंच व सापळा पथक यांना योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर भेटीचे ठिकाण ठरवण्यासाठी तक्रारदार यांनी त्यांचे मोबाईल क्रमांकवरुन पोलीस हवालदार कसपटे यांचे मोबाईल क्रमांक वर फोन कॉल केला ती वेळ 13.17 वा ची होती. सदर संभाषण वेळी मधुबन हॉटेल ढोले पाटील क्षेत्रीय कार्यालय येथे भेटण्याचे ठरले.त्यानंतर सुचनांची उजळणी करुन तक्रारदार यांना व्हॉईस रेकॉर्ड चालु करुन लाऊन देऊन पंच क्र.1 गजपुरे यांचेसह तक्रारदार यांचे दुचाकी ने रवाना केले ती वेळ 13.21 वा ची होती.त्या पाठोपाठ सापळा पथक व पंच रवाना झाले.

तक्रारदार व पंच क्र.01 हे मधुबन हॉटेल ढोले पाटील क्षेत्रीय कार्यालय येथे आतील बाजुस जाऊन बसले.त्यांनतर मी व मपोहवा गोरे असे मधुबन हॉटेल चे बाहेरील बाजुस बसलो व पोहवा गदादे हे मधुबन हॉटैलच्या बाहेर थांबले व शासकीय वाहनामध्ये पंच क्र.02 व मसपोफौ श्रीगार हे व चालक माळी हे थांबून राहीले. थोडया वेळाने पोहवा कसपटे हे मधुबन हॉटेल मध्ये आले व तक्रारदार व पंच क्र.01 हे बसलेल्या ठिकाणी जाऊन त्यांचेशी बोलणी केली व हॉटेल मधुन बाहेर पडले त्या पाठोपाठ तक्रारदार व पंच क्र.01 हे सुध्दा हॉटेल च्या बाहेर पडले. हॉटेलच्या बाहेर त्यांचेमध्ये संभाषण चालु होते त्यानंतर पोहवा कसपटे हे त्यांचेकडील दुचाकी वर बसुन तक्रारदार व पंच यांना त्यांचे पाठोपाठ येणेस सांगुन तेथे जवळ असणा-या झेरॉक्स चे दुकानात गेले.त्यांचे पाठोपाठ तक्रारदार व पंच हे गेले सदर वेळी आम्ही सापळा पथक संशय येणार नाही अशा रीतीने झेरॉक्सचे दुकाना बाहेर आजजुबाजुला तक्रारदार यांचे इशा-याची वाट पाहत थांबुन राहीलो.काही वेळाने पोलीस हवालदार कसपटे हे तक्रारदार यांचेशी बोलत झेरॉक्स दुकान चे बाहेर आले व तक्रारदार यांना त्यांचे दुचाकी वर बसण्यास आग्रह करत असल्याचे व पंच यांना सदर ठिकाणी थांबवत असल्याचे दिसत होते.त्यानंतर तक्रारदार हे पोलीस हवालदार कसपटे यांचे दुचाकी वर बसले असता कसपटे यांनी दुचाकी चालु केली. सदर दुचाकी च्या मागे मी व पोहवा गोरे असे दुचाकी वरुन तसेच पंच क्र.01 हे तक्रारदार यांचे दुचाकी वरुन व पोहवा गदादे हे त्यांचे दुचाकी वरुन व त्यांचे पाठोपाठ शासकिय वाहन असे गेलो.पोलीस हवालदार कसपटे हे तक्रारदार यांना काही अंतरावर घेऊन जाऊन सुलक्स, कल्पतरु सोसायटी समोर पानटपरी जवळ बोट क्लब रोड पुणे येथे दुचाकी थांबवली सदर वेळी पंच क्र.01 हे त्यांचे पासुन काही अंतरावरती तक्रारदार व हवालदार कसपटे हे दिसतील अशा ठिकाणी थांबुन राहीले तसेच सापळा पथक आजुबाजुला थांबुन राहीले.त्यानंतर काही वेळाने तक्रारदार यांनी लाच रक्कम स्विकारलेचा पुर्व नियोजि इशारा केला असता त्याला पकडणेसाठी जात असताना पोलीस हवालदार कसपटे हे तक्रारदार यांना दुचाकी वर घेऊन पळुन जाऊ लागले असता मी व पोहवा गोरे यांनी त्याला पकडुन ताब्यत घेतले त्यावेळी मपोहवा गोरे यांनी तक्रारदार यांचेकडील रेकॉर्डर काढुन बंद केला ती वेळ 14.08 वा ची होती.सदर वेळी पोहवा कसपटे झटापट करण्याच्या तयारीत असताना मी त्यांना पोलीस निरीक्षक निंबाळकर अँटी करप्शन ब्युरो पुणे व महिला अंमलदार गोरे व सोबत पंच असल्याचे सांगुन ओळख करुन दिली यावेळी तक्रारदार देखील बाजुलाच उभे होते.पोहवा कसपटे यांनी पळुन जाण्याचा प्रयत्न केला त्यांनी माझेशी धक्काबुक्की करुन हात पकडुन पिरगळला तसेच महीला पोलीस अंमलदार गोरे यांनी आलोसे यांचा डावा हात पकडला असता त्यांना देखील धक्काबुक्की करुन ढकलुन दिले.सदर वेळी त्यांनी पळुन जाण्याचा प्रयत्न करत तक्रारदार जोशी यांच्या डावे छातीवर जोराचा चावा घेऊन त्यांना जखमी केले.त्यावेळी आम्ही पोलीस हवालदार कसपटे यांना आवरण्याचा प्रयत्न करुन ताब्यात घेतले.त्यावेळी त्यांना स्विकारलेल्या लाच रकमेबाबत विचारले असता त्यांनी सदर लाच रक्कम तेथे असलेल्या पान टपरी बाहेर असलेल्या कच-याच्या पुठ्ठयाच्या बॉक्स मध्ये टाकल्याचे पंचासमक्ष सांगितले तसेच पंच क्र.01 व तक्रारदार यांना लाच रकमे बाबत विचारणा केली असता त्यांनी ही पोहवा कसपटे यांनी स्वत: हाताने लाच रक्कम स्विकारल्याचे सांगुन पळुन जात असताना सदरची लाच रक्कम असलेली पांढ-या रंगाची पिशवी पान टपरी जवळ असलेल्या कच-याच्या बॉक्स मध्ये टाकली असल्याचे सांगितले.सदर वेळी व्हिडीओ चित्रीकरण चालु करणेत आले. पोहवा कसपटे यांचे दोन्ही हात पकडलेल्या स्थितीत लाच रक्कम टाकुन दिलेले ठिकाणाबाबत विचारणा केली असता त्यांनी लाच रक्कम टाकुन



Scanned with CamScanner

दिलेला पुठ्ठयाचा बॉक्स दाखवला सदर बॉकस मधुन लाच रक्कम असलेली पांढ-या रंगाची पिशवी पंच क्र.02 यांनी काढुन पाहणी केली असता त्यामध्ये लाच रक्कम दिड लाख रुपये मिळुन आले सदर नोटांचे क्रमांक यापुर्वी लिहीलेल्या नोटांच्या क्रमांकाशी पंच क्र.02 यांनी तपासुन पाहीले असता ते तंतोतंत जुळुन आले.त्यानंतर लोकसेवकास त्याचे नाव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव श्री.गणेश शहाजी कसपटे वय-40 वर्षे पद -पोलीस हवालदार ब.नं.2781 नेमणुक कोरेगाव पार्क पोलीस स्टेशन पुणे शहर रा.फलॅट नं.306 शंकर सुमन हाईटस् भेकराई नगर शिवशक्ती चौक फुरसुंगी पुणे असे सांगितले.त्यानंतर आमचे सुचनेवरुन लोकसेवक पोलीस हवादार कसपटे यांना शासकिय वाहनात घेऊन कृत्रीम अंधार करुन अल्ट्राव्हॉयलेट दिव्याच्या सहाय्याने त्यांचे दोन्ही हाताची तपासणी केली असता त्यांचे हातावर अँन्थ्रॉसीन पावडरची फिक्कट निळसर रंगाची चकाकी दिसून आली.त्यानंतर पंच क्र.2 श्री.कांबळे यांचे हातास अँन्थ्रॉसीन पावडरची फिक्कट निळसर रंगाची चकाकी दिसून आली कारण त्यांनी सापळा यशस्वी झालेनंतर लाच रक्कम असलेली पिशवी पुठ्ठयाच्या बॉक्स मधुन ताब्यात घेतली होती.ताब्यात घेतलेली लाच रक्कमेची पिशवी अल्ट्राव्हायलेट दिव्याच्या प्रकाशात पाहिली असता त्यावर देखील फिक्कट निळसर रंगाची चकाकी दिसून आली.तसेच तक्रारदार जोशी यांचे हाताची अल्ट्राव्हॉयलेट दिव्याच्या सहाय्याने तपासणी केली असता त्यांचे हातावरही फिक्कट निळसर रंगाची चकाकी दिसून आली.

तसेच तक्रारदार श्री.जोशी व पंच क्र.01 यांना सापळा कारवाई दरम्यान घडलेल्या घटनेबाबत विचारणा केली असता तक्रारदार यांनी सांगितले की, सापळा कारवाई कामी रवाना झालेनंतर मी व पंच गजपुरे असे मधुबन हॉटेलमध्ये गेलो व पोलीस हवालदार कसपटे यांना फोन करुन मधुबन हॉटेल मध्ये बसलो असल्याचे सांगितले त्यावेळी पोलीस हवालदार कसपटे यांनी थोडया वेळात येत असल्याचे सांगितले.त्यानंतर थोडया वेळाने कसपटे यांचा माझे मोबाईल वर फोन आला त्यावेळी त्यांनी हॉटेल मध्ये आल्याचे सांगितले असता त्यांना मी आत मध्ये बसलो असुन त्यांना हॉटेलच्या आतमध्ये बोलावले. त्यानंतर पोलीस हवालदार कसपटे हे मी व पंच बसलेल्या ठिकाणी आले. त्यावेळी त्यांनी बाहेर जाऊ झेरॉक्स काढायाच्या आहेत असे सांगुन बाहेर चला असे म्हणुन बाहेर गेले त्यांचे पाठोपाठ मी व पंच गजपुरे असे हॉटेलमधुन बाहेर आलो त्यावेळी ते त्यांच्या गाडीवर बसुन मलाही त्यांचे सोबत हॉटेल पासुन जवळ असलेल्या झेरॅाक्स चे दुकानात चला असे म्हणालेने मी व पंच त्यांचे पाठोपाठ गेलो त्यांनतर कसपटे यांनी त्यांचे कडील माझे मालक यांना दयावयाच्या वॉरंट ची झेरॉक्स काढली व झेरॉक्स दुकानातुन बाहेर आले. त्यावेळी पेािलीस हवालदार कसपटे हे मला घाई नका करु असे म्हणाले त्यावर मी कसपटे यांना मला ऑफीसला जायचे असल्याचे सांगितले असता त्यांनी मला त्यांचे गाडीवर बसणेस सांगितले व ऑफीसला सोडतो असे म्हणुन मला त्यांचे गाडीवर बसणेचा आग्रह करु लागले त्यावेळी मी पंच यांना माझी गाडी चालवता येत नसलेचे सांगितले असता पोलीस हवालदार कसपटे यांनी मला दोन मिनीट बसा असे म्हणुन मला त्यांचे गाडीवर बसवुन माझे ऑफीसच्या दिशेन घेऊन गेले व माझे पठोपाठ पंच क्र.01 व सापळा पथक आले. माझे ऑफीसचे समोर असलेल्या पान टपरी जवळ कसपटे यांनी गाडी थांबवली सदर वेळी त्यांनी मला “कितीयत”? असे विचारुन लाच रकमेची मागणी केली त्यावर माझे कडील पॅंट च्या उजव्या खिशामध्ये असलेली लाच रक्कमेची पिशवी त्याच्या समोर धरुन “हा..मोजून घे बंडल..दिड” असे म्हणालो त्यावर पोलीस हवालदार कसपटे यांनी “ठिकय राहू दे” असे म्हणुन लाच रकमेची पिशवी हातामध्ये घेतली व आतील लाच रक्कम हाताने तपासुन पाहीली त्यावेळी मी “नाय नाय बंडल बघून घे ना कमी हाय का? असे विचारले असता पोलीस हवालदार कसपटे “नाय” असे म्हणाले त्यानंतर मी लाच रक्कम स्विकारलेचा पुर्व नियोजीत इशारा केला व सदर वेळी त्याने मला त्याचे गाडीवर बसवुन निघुन जाऊ लागला असता पोलीस निरीक्षक निंबाळकर यांनी त्याची गाडी थांबवुन त्यास लाचलुचपत प्रतिंबधक विभागाचे अधिकारी व पथक असल्याचे व सोबत पंच असल्याचे सांगुन देखील त्यांनी सदर कारवाई मधुन पळ काढण्याच्या उद्देशाने पथकास धक्का बुक्की केली व माझे डावे छातीवर दाताने जोराचा चावा घेऊन दुखापत केली आहे. अशा आशयाची हकिकत सांगितली सदर बाबत सविस्तर पंचनामा करणेत आला आहे.

तरी तक्रारदार श्री.नितेश पुरुषोत्तम जोशी यांनी दि.05/05/2026 रोजी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने दि. 05/05/2026 रोजी 18.09 वा ते 19.19 वा चे दरम्यान करण्यात आलेल्या पडताळणी कारवाई दरम्यान तक्रारदार यांचे मालक श्री.सुशिल घनश्यामदास अगरवाल यांचे विरुध्द हैद्राबाद न्यायालयात चालु असलेल्या चेक बाऊन्स केस मध्ये हैद्राबाद न्यायालयाने काढलेल्या अजामीनपात्र वॉरंट मध्ये श्री.सुशिल आगरवाल यांना अटक न करणेसाठी व मदत करणेसाठी यापुर्वी पाच लाख रुपये स्विकारल्याचे मान्य करुन यातील तक्रारदार श्री.जोशी यांचेकडे पोलीस हवालदार गणेश कसपटे यांनी दोन लाख रुपये लाच मागणी करुन तडजोडीअंती दिड लाख रुपये लाच मागणी केली.दि.06/05/2026 रोजीच्या सापळा कारवाई दरम्यान तक्रारदार यांचेकडुन पोलीस हवालदार गणेश कसपटे यांनी दिड लाख रुपये लाच रक्कम स्विकारली व पळुन जात असताना सुलक्स, कल्पतरु सोसायटी



Scanned with CamScanner

समोर पानटपरी जवळ बोट क्लब रोड पुणे येथे 14.08 वा चे सुमारास रंगेहात पकडणेत आले आहे.त्यावेळी त्यांना आम्ही पोलीस निरीक्षक निंबाळकर लाप्रवि पुणे असल्याचे व सोबत पंच असल्याचे सांगुन देखील त्यांनी सदर कारवाई मधुन पळ काढण्याच्या उद्देशाने धक्का बुक्की करुन तक्रारदार श्री.नितेश जोशी यांचे डावे छातीवर दाताने जोराचा चावा घेऊन दुखापत केली आहे.तसेच माझा उजवा हात पिरगळुन धक्काबुक्की केली तसेच मपोहवा अंमलदार गोरे यांना देखील धक्काबुक्की करुन सदर कारवाई होणेपासुन परावृत्त करण्याचा प्रयत्न करुन सापळा कारवाई मध्ये अडथळा आणुन आम्हा पथकास शासकिय कर्तव्य करण्यापासुन परावृत्त करण्याचा प्रयत्न केला म्हणुन श्री.गणेश शहाजी कसपटे वय-40 वर्षे पद -पोलीस हवालदार ब.नं.2781 नेमणुक कोरेगाव पार्क पोलीस स्टेशन पुणे शहर रा.फ्लॅट नं.306 शंकर सुमन हाईटस् भेकराई नगर शिवशक्ती चौक फुरसुंगी पुणे यांचे विरुध्द भ्रष्टाचार प्रतिंबधक अधिनियम कलम 7 व भारतीय न्याय संहीता कलम 115(2),132,121(1) प्रमाणे कायदेशीर फिंयाद आहे.

माझा वरील फिंयादी जबाब माझे सांगणे प्रमाणे टंकलिखीत करण्यात आला असून तो मी वाचून पाहीला असून बरोबर आहे.

हा फिंयादी जबाब दिला....

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

(1) **Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

Vijaykumar Udaybhanu Doke(I (Inspector)) / DFDVUDM7701 **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**

**Rank (पद):** **No.(क्र.):**

**to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

(4) **Transferred to P.S. (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):**

**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**



Scanned with CamScanner

**Registered by** (नोंदणी अधिकारी)

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): Vijaykumar Udaybha
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): DEDVUDM7701

PF ACB

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

PSI
(ठाणे अंमलदार)
कोरेगाव पार्क पो.स्टे., पुणे शहर



Scanned with CamScanner